मुंबई विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/७८८
दिनांक : ०५.१०.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : " मेरी माटी मेरा देश " कार्यक्रमातंर्गत अमृत कलश संकलन व सेल्फी अपलोड करणेबाबत.**

**संदर्भ :** रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२३/प्र.क्र.१७१ /साशि-७, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त केंद्र शासनाच्या संदर्भाधिन पत्रानुसार "मेरी माटी मेरा देश" कार्यक्रमातंर्गत अमृत कलश संकलन व यात्रा दिनांक १ - १३ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत विद्यापीठातंर्गत सर्व महाविद्यालयीन रा.से.यो. एककांमध्ये आयोजित करण्यात यावी. कार्यक्रम अधिकारी व स्वंयसेवक यांनी महाविद्यालयात खालीलप्रमाणे मेरी माटी मेरा देश उपक्रमातंर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

- विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होऊन प्रत्येकाने हातात माती घेऊन दिलेल्या लिंकवर सेल्फी फोटो अपलोड करण्यात यावा. https://selfiwithmerimaati.in/photoupload/
- सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी आपल्या घरातून थोडी माती अथवा तांदूळ महाविद्यालयात येत असताना घेऊन येतील.
- माती अथवा तांदुळ महाविद्यालयात घेऊन आल्यानंतर अमृतकलश मध्ये एकत्र जमा करतील.
- अमृतकलश यात्रा महाविद्यालय परिसरातच आयोजित करण्यात यावी.
- माती व तांदुळ जमा करीत असताना विद्यार्थ्यांना पंचप्रण शपथ घेण्यास प्रोत्साहीत करण्यात यावे.
- वृक्षारोपण करून वृक्षांना स्थानिक वीरांची नावे देण्यात यावीत व शिलाफलक तयार करावा.
- महाविद्यालय परिसरात स्वदेशी ७५ वृक्षाची अमृत वाटीका/अमृत कुंडी/अमृत बगीचा तयार करण्यात यावे.
- मेरी माटी मेरा देश कार्यक्रमातंर्गत अमृत कलक्ष यात्रा दरम्यान फोटो काढण्यात यावेत व ते https://yuva.gov.in या पोर्टल वर अपलोड करण्यात यावेत.

मेरी माटी मेरा देश कार्यक्रमातंर्गत राबविण्यात आलेल्या सर्व उपक्रमांचा व सेल्फी फोटोचा अहवाल यापुर्वी पाठविण्यात आलेल्या नमुन्यात या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावा.

**आपला**

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**- - s d - -**
**सुधीर पुराणिक**
**संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ**